# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

## Date – 02 February 2023

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी औरंगाबाद

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०२ फेब्रुवारी २०२३ दुपारी १.०० वा.

****

अदानी समूहावरील हिंडनबर्ग रिसर्चच्या अहवालावर आणि त्याचा भारतीय शेअर बाजारावर झालेला परिणाम आणि इतर मुद्द्यांवर विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज बाधित झालं.

लोकसभेत कामकाज सुरु होताच काँग्रेस, तृणमुल काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम यांच्यासह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी करत हौद्यात उतरुन घोषणाबाजी सुरु केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना शांत राहण्याचं आणि कामकाज सुरु ठेवण्याचं आवाहन केलं, मात्र गोंधळ सुरुच राहील्यानं लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित झालं.

राज्यसभेत आज कामकाज सुरु झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी एलआयसी, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका आणि वित्तीय संस्थांनी बाजार मूल्य गमावलेल्या कंपन्यांमधल्या गुंतवणुकीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी स्थगन प्रस्ताव दिला. मात्र सभापती जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव नाकारल्यानं विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे राज्यसभेचंही कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित झालं.

***

राज्यातल्या विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातल्या पाच जागांसाठी आज मतमोजणी होत आहे. यामध्ये मराठवाडा, कोकण, नागपूर शिक्षक मतदारसंघ तसंच अमरावती आणि नाशिकच्या पदवीधर मतदारसंघांचा समावेश आहे.

***

लातूर इथल्या रेल्वे डबे निर्मिती कारखान्यात वंदे भारत एक्स्प्रेसची निर्मिती केली जाणार असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. दोन वर्षांपूर्वी हा कारखाना सुरू झाला असला तरी कोणत्याही मोठ्या प्रकल्पातल्या रेल्वे गाड्यांची बांधणी अद्यापही होऊ शकलेली नाही. मात्र आता वंदे भारतची निर्मिती या कारखान्यात सुरू होणार आहे. लातूरसह चेन्नई, सोनीपत, रायबरेली इथं वंदे भारत एक्सप्रेसची निर्मिती होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत स्वदेशी हायड्रोजन ट्रेनची सुरुवात डिसेंबर २०२३ मध्ये करण्यात येणार असून, यावर्षी बुलेट ट्रेनच्या कामावर विशेष लक्ष केंद्रीत करणार असल्याची माहितीही रेल्वेमंत्र्यांनी यावेळी दिली.

***

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे राज्यभरात पर्यटक निवासस्थानी तृणधान्य महोत्सवांचा शुभारंभ काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आला. राज्यातल्या पर्यटक निवासामध्ये आता बाजरी, ज्वारीच्या भाकरीसह, लसणाची चटणी आणि पौष्टिक तृणधान्यापासून तयार केलेले पदार्थ उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना व्यवस्थापनाला दिल्या असल्याचं लोढा यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत औरंगाबाद, अजिंठा, भंडारदरा, नाशिक, महाबळेश्वर,लोणार,बोधलकसा,तारकर्ली आणि गणपतीपुळे इथल्या पर्यटक निवासस्थानी या महोत्सवांचं आयोजन केलं जाणार आहे.

***

राज्यातल्या अंगणवाडी मदतनीस आणि सेविकांची अंतिम निवड करण्याचा अधिकार बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार, सेविकांसाठी शैक्षणिक पात्रता दहावीऐवजी बारावी करण्यात येणार असून, त्यासंबंधीच्या शासन निर्णयाला अंतिम मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ भरतीला सुरवात होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

***

राज्यातल्या कलापथकांना भांडवली तसंच प्रयोगासाठी अनुदान मंजूर करणाऱ्या समितीचं पुनर्गठन करण्यात आलं आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे समितीचे अध्यक्ष असून या समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल. ही समिति कलापथकांच्या अर्जाची छाननी करणे, त्यांची पात्रता तपासून अनुदान मंजूर करण्याचं काम करणार आहे.

***

अहमदनगर जिल्ह्यात राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात, जागतिक बँक अर्थसहाय्यीत उच्च शिक्षण प्रकल्प आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या वतीनं, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत भविष्यकालीन कृषी तंत्रज्ञान, या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. कृषी क्षेत्रातील आयओटी, ड्रोन आणि रोबोटीक्स इत्यादींचा वापर पिकांचं निरीक्षण, सर्वेक्षण आणि प्रक्षेत्राचे नमुने तसंच डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

***

परभणी जिल्ह्यात नऊ आणि १० तारखेला सर्व पोस्ट ऑफिसमध्ये सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत खाते उघडण्यासाठी विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. पालकांनी या शिबिरात सहभागी होण्याचं आवाहन डाकघर अधीक्षक मोहम्मद खदीर यांनी केलं आहे.

//**********//